# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
## मध्यवर्ती इमारत, पुणे – ४११ ००१

१७ वी घटना दुरुस्ती व दिनांक ३१/१०/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची पुणे येथे स्थापना करण्यात आली असून सदर प्राधिकरणात कंत्राटी पध्दतीने भरती करण्यासाठी उपरोक्त कार्यालयामार्फत राज्य शासनाच्या सेवेतून **सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी** यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | पदभरतीच्या माध्यमासाठी अर्जदार ज्या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झाला असेल त्या श्रेणीचा तपशिल | अनुज्ञेय पारिश्रमिक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सहकार निवडणूक अधिकारी | १ | पी.बी.३ रुपये १५६००-३९१०० + ग्रेड वेतन ७६०० | सामान्य प्रशासन विभागच्या दिनांक १५/०२/९५ च्या निर्णयानुसार अनुज्ञेय. |
| २ | सहाय्यक सहकारी निवडणूक अधिकारी | १ | पी.बी.३ रुपये १५६००-३९१०० + ग्रेड वेतन ६६०० | |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | ३ | पी.बी.२ रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४८०० | |
| ४ | लेखा अधिकारी तथा रोखपाल | १ | पी.बी.२ रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४४०० | |
| ५ | सांख्यिकी अधिकारी | १ | पी.बी.२ रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४४०० | |
| ६ | उच्च श्रेणी लक्षुलेखक | १ | पी.बी.२ रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४४०० | |
| ७ | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | ६ | पी.बी.२ रुपये ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४३०० | |
| ८ | लिपीक टंकलेखक | ६ | पी.बी.२ रुपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन १९०० | |
| ९ | विधी सल्लागार | १ | सदरचे पद पी.बी.३ रुपये १५६००-३९१०० + ग्रेड वेतन ६६०० | १)पहिल्या वर्षी रु. ५००००/- इतके एकत्रित मानधन<br>२)त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी १० टक्के या प्रमाणे मानधनात वाढ करण्यात येईल |
| १० | शिपाई | ३ | शिपायाचे पद बाहय स्तोत्राद्वारे (आऊट सोर्सिग द्वारे) ठोक रक्कम देवून कंत्राटी तत्वावर | १)पहिल्या वर्षी रु. १२०००/- इतके एकत्रित मानधन<br>२)त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी १० टक्के या प्रमाणे मानधनात वाढ करण्यात येईल |

१. अर्जदारांनी त्यांचे अर्ज ए-४ कागदावर टंकलिखित करुन ते सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे – ४११ ००१ या पत्त्यावर पाठवावेत.

२. अर्जदारांनी अर्जात त्याची जन्मतारीख, सेवानिवृत्तिची तारीख, पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरधवनी/भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी बाबी ठळक व अचूक नमूद कराव्यात.

३. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीबीई- १८९३/प्र.क्र.३८/९३/तेरा, दिनांक १५/०२/१९९५ आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरईएम- १५०९/प्र. क्र.५८/२००९/१३, दिनांक १४/०१/२०१० मधील अटी व शर्ती नुसार असतील व त्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर पाहता येतील.

४. सदर जाहीरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकपासून १५ दिवसांचे आंत संबंधीतांनी त्यांचे अर्ज पोस्टाने उपरोक्त पत्त्यावर पाठवावेत. स्वहस्ते अर्ज सुध्दा वरील पत्त्यावर विहीत मुदतीत स्वीकारले जातील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

५. भरती करावयाच्या पदांबाबतच्या अटी व शर्ती बाबतची माहिती या कार्यालयातून समक्ष प्राप्त करुन घ्यावी. संपर्कासाठी श्री. प्रशांत सातपुते, उपनिबंधक, सहकारी संस्था (आस्थापना) मुख्यालय, पुणे यांचेशी संपर्क साधावा

९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी स्वतंत्र्य राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सववि ३११३/ प्र. क्र. ७२/आस्था १**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई
तारीख: ३१ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना -**

९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी स्वतंत्र्य राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करून त्याकरिता ४७ पदे निर्माण करण्यास मा. मंत्रीमंडळाने दिनांक ३०/१/२०१३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

२. त्यानुसार, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे दिनांक ३०/३/२०१३ च्या अधिसुचने अन्वये गठण करण्यात आले आहे.

३. दिनांक ३०/३/२०१३ च्या अधिसुचने अन्वये गठण करण्यात आलेल्या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणासाठी पदे निर्माण करण्यासंबंधी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/१०/२०१३ रोजी उच्च स्तरिय समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीच्या अनुषंगाने ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी गठित केलेल्या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणासाठी पदे निर्माण करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय -**

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने, ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी गठित केलेल्या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणासाठी मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिलेल्या ४७ पदांमधून ३ पदे वगळून उर्वरित ४४ पदे निर्माण करण्यास आणि सदर पदांची वेतनश्रेणी तसेच पदांच्या पदभरतीबाबत तसेच भरतीच्या प्रकाराबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या | पदभरतीचे माध्यम | पदभरतीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १. | राज्य सहकारी निवडणूक आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण | ९७ व्या घटना दुरुतीतील बाब कलम ७३ (क) (ब) (४) नुसार सामान्य प्रशासन विभाग तसेच वित्त विभागाच्या मान्यतेने या पदाच्या वेतन व भत्ते याबाबत वेगळयाने अधिसुचना निर्गमित करण्यात येईल. | १ | सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील किमान सचिव दर्जाचे अधिकारी यांमधून | कायद्यातील तरतुदीनुसार |

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या | पदभरतीचे माध्यम | पदभरतीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| २. | सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण | पी. बी. २- रु. ३७४००-६७०००+ ग्रेड वेतन ८७०० | १ | अप्पर निबंधक सहकारी संस्था या पदावर कार्यरत असलेले अधिका-यांपैकी प्रतिनियुक्तीने | प्रतिनियुक्ती |
| ३. | सहकार निवडणूक अधिकारी | पी. बी. ३- रु. १५६००-३९१००+ ग्रेड वेतन ७६०० | २ | प्रस्तावित वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अधिकारी यांमधून प्रतिनियुक्तीने अथवा या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | मंजूर पदसंख्येच्या ५० टक्के प्रतिनियुक्तीने आणि ५० टक्के कंत्राटी तत्वावर याप्रमाणे |
| ४. | सहाय्यक सहकार निवडणूक अधिकारी | पी. बी. ३- रु. १५६००-३९१००+ ग्रेड वेतन ६६०० | २ | प्रस्तावित वेतनश्रेणीत कार्यरत असलेले अधिकारी यांमधून प्रतिनियुक्तीने अथवा या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत ) | मंजूर पदसंख्येच्या ५० टक्के प्रतिनियुक्तीने आणि ५० टक्के कंत्राटी तत्वावर याप्रमाणे |
| ५. | विधी सल्लागार | १) पहिल्या वर्षी रु. ५००००/- इतके एकत्रित मानधन<br>२) त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी १० टक्के याप्रमाणे मानधनात वाढ करण्यात येईल. | १ | सदरचे पद पी. बी. ३- रु. १५६००-३९१००+ ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधुन अथवा विधीची पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या आणि प्रत्यक्ष वकीलीचा १० वर्षाचा अनुभव असलेल्या व्यक्तीमधून एकत्र | कंत्राटी पध्दतीने |

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या | पदभरतीचे माध्यम | पदभरतीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ६. | प्रशासकीय अधिकारी | पी. बी. २- रु. ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४८०० | ६ | सदरचे पद रु. ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४८०० या वेतन श्रेणीतील अधिकारी यांमधून प्रतिनियुक्तीने अथवा या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | मंजूर पदसंख्येच्या ५० टक्के प्रतिनियुक्तीने आणि ५० टक्के कंत्राटी तत्वावर याप्रमाणे |
| ७. | लेखा अधिकारी तथा रोखलेखापाल | पी. बी. २- रु. ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४४०० | १ | प्रस्तावित वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | कंत्राटी तत्वावर |
| ८. | सांख्यिकी अधिकारी | पी. बी. २- रु. ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४४०० | १ | प्रस्तावित वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | कंत्राटी तत्वावर |
| ९. | उच्च श्रेणी लघुलेखक | पी. बी. २- रु. ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४४०० | २ | प्रस्तावित वेतनश्रेणीत कार्यरत असलेले कर्मचारी यांमधून प्रतिनियुक्तीने अथवा या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | मंजूर पदसंख्येच्या ५० टक्के प्रतिनियुक्तीने आणि ५० टक्के कंत्राटी तत्वावर याप्रमाणे |

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या | पदभरतीचे माध्यम | पदभरतीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १०. | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | पी. बी. २- रु. ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४३०० | १२ | प्रस्तावित वेतनश्रेणीत कार्यरत असलेले कर्मचारी यांमधून प्रतिनियुक्तीने अथवा या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | मंजूर पदसंख्येच्या ५० टक्के प्रतिनियुक्तीने आणि ५० टक्के कंत्राटी तत्वावर याप्रमाणे |
| ११. | लिपीक टंकलेखक | पी. बी. २- रु. ५२००-२०२००+ ग्रेड वेतन १९०० | १२ | प्रस्तावित वेतनश्रेणीत कार्यरत असलेले कर्मचारी यांमधून प्रतिनियुक्तीने अथवा या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांमधुन कंत्राटी तत्वावर (कालावधी वयाच्या ६५ वर्षापर्यंत) | मंजूर पदसंख्येच्या ५० टक्के प्रतिनियुक्तीने आणि ५० टक्के कंत्राटी तत्वावर याप्रमाणे |
| १२. | शिपाई | १) पहिल्या वर्षी रु. १२०००/- इतके एकत्रित मानधन<br>२) त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी १० टक्के याप्रमाणे मानधनात वाढ करण्यात येईल. | ३ | शिपायाचे पद बाहय स्तोत्राव्दारे (आउट सोर्सिंग द्वारे) ठोक रक्कम देवून कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावे. | बाहय स्तोत्राव्दारे (आऊट सोर्सींगव्दारे) |
| | | एकूण | ४४ | | |

२. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणासाठी घ्यावयाचे वाहन हे शासनाच्या स्थायी आदेशानुसार वाहन चालकासह भाडे तत्वावर घेण्यात येणार असल्यामुळे, मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली वाहनचालकांची २ पदे वगळण्यात आली आहेत.

३. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावरील लेखा अधिकारी या पदाचे पदनाम बदलून ते लेखा अधिकारी तथा रोखलेखापाल असे करण्यात आले आहेत. त्यामुळे मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिलेले रोखलेखापालाचे १ पद वगळण्यात आले आहे.

४. राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी स्थापन करण्यात येणा-या राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणावर नियुक्त करण्यात येणारे अधिकारी / कर्मचारी हे शासन सेवेतील कार्यरत अथवा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी

सेवा नियमातील नियम तसेच वेळोवेळी शासनामार्फत जारी केलेली परिपत्रके / शासन निर्णय यामधील तरतूदी लागू राहतील.

५. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावरील बाहय स्त्रोत्राव्दारे (आऊट सोर्सीग) भरण्यात येणारी शिपाई संवर्गातील पदे ही वित्त विभागाच्या स्थायी आदेशानुसार भरण्यात येतील.

६. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावरील पदे प्रतिनियुक्ती / पुर्ननियुक्ती /बाहय स्तोत्र (आऊट सोर्सीग) याव्दारे भरण्यात येणार असल्याने त्याबाबतचे सेवा नियम बनवण्याची कार्यवाही करावी लागेल. ती नजिकच्या काळात पूर्ण करण्यात येईल.

७. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या मान्यतेने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौस ५१९/१३/व्यय.२ दिनांक २९/१०/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०३११५००५७८८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Devara Rajgopal

Digitally signed by Devara Rajgopal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=CMTD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Devara Rajgopal
Date: 2013.11.01 12:37:23 +05'30'

**(राजगोपाल देवरा)**
सचिव (सहकार), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सहकार), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (पणन), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (पणन), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (सहकार), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र -१ /२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
९. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे -५
११. संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

१२. पणन संचालक, पणन संचालनालय, पुणे

१३. संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर

१४. श्री. स. अ. पाटील, विशेष कार्य अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

१५. सर्व सह सचिव / उप सचिव /अवर सचिव / कक्ष अधिकारी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

१६. सर्व मंत्रालयीन विभाग

१७. सर्व विभागीय आयुक्त, महसूली विभाग

१८. मा. सर्व आमदार/खासदार, महाराष्ट्र राज्य,

१९. निवड संग्रह आस्था -

------------

शासकीय अधिकारी/कर्मचारी व विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांना करारपध्दतीने नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीबीई-1893/प्र.क्र.38/93/नेग
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 15 फेब्रुवारी, 1995.

वाचा:- 1. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरईएम-1089/प्र.क्र.2/89/13, दिनांक 9.2.1989.

2. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आरईएम-1593/प्र.क्र. [illegible] 13, दिनांक 22.12.1993.

3. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आरईएम-1594/467/13, दिनांक 3.9.1994.

**शासन निर्णय**:- शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना अतिशय अपवादात्मक परिस्थितीत व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुनर्नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरईएम-1089/प्र.क्र.2/89/तेरा, दिनांक 9.2.1989 अन्वये जे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, त्या संदर्भात 'सुधारित आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरईएम-1594/467/13, दिनांक 3.9.1994 अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु मंत्रालयीन विभागांकडून शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना करारपध्दतीनेही नियुक्ती देण्याबाबतचे प्रस्ताव या विभागात प्राप्त होतात. याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती निश्चित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत:-

1) करारपध्दतीने नियुक्ती ही नियमित कामकाजासाठी न करता विवक्षित कामासाठी (उदा. पूर्वी ज्या प्रकारची कामे शासकीय यंत्रणेद्वारे करण्यात आलेली आहेत आणि त्यासाठी अनुभवी कर्मचारी उपलब्ध नसतील अशी कामे करणे, शासकीय नियम पुस्तिकांचे अद्यावतीकरण करणे, प्रकल्प/योजनेचा आराखडा तयार करणे इत्यादी) करण्यात यावी, अशा व्यक्तीस त्या कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा विशेष अनुभव असणे ही पूर्व अट ठेवण्यात यावी.

2) ज्या विशेष कामासाठी करार पध्दतीने नेमणूक केली जाईल त्या कामाचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेऊन नेमणूकीचा कालावधी निश्चित करण्यात यावा आणि असा कालावधी कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापेक्षा जास्त असू नये.

3) सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी याची करार पध्दतीने नियुक्ती केल्यास त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन वजा निवृत्तीवेतन अशी जी एकुण रक्कम येईल ती रक्कम पारिश्रमिक म्हणून देण्यात यावी. मात्र पारिश्रमिकाची रक्कम कंत्राट पध्दतीने नियुक्ती करण्यात येणा-या पदाच्या वेतनश्रेणीतील कमाल टप्प्यापेक्षा जास्त असू नये.

4) प्रकल्प/योजनेचा आराखडा तयार करताना किंवा अन्य विशेष कामासाठी त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची करार पध्दतीने नेमणूक केल्यास त्या कामाचे स्वरुप व कालावधी लक्षात घेऊन अशा व्यक्तीस द्यावयाचे पारिश्रमिक स्वतंत्रपणे गुणवत्तेनुसार ठरावे. मात्र हे पारिश्रमिक रुपये 10,000/- पर्यंत मर्यादित ठेवावे.

(कृ.मा.प.)

99/प

5) नेमणूकीच्या विहित कालावधीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी त्या व्यक्तींची राहील व तसे बंधपत्र यांच्याकडून घेण्यात यावे. काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभाग प्रमुखांनी दिल्यानंतरच पारिश्रमिकाच्या शेवटच्या दोन मासिक हप्त्यांची रक्कम त्यांना देण्यात यावी. विहित मुदतीत सोपविलेले काम सदर व्यक्तींच्या आटोक्याबाहेरील कारणामुळे पूर्ण झाले नाही तरच मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात यावा.

6) सदर अधिका-यांस/कर्मचा-यास त्याच्यावर सोपविलेल्या कामाचे स्वरुप/अनुज्ञेयता लक्षात घेऊन दूरध्वनी व वाहन सवलत देण्याबाबत विचार करण्यात यावा.

7) शासकीय निवासस्थानात रहाणा-या व्यक्तीची करार पध्दतीने नेमणूक केल्यास व करार कालावधीत तो अधिकारी शासकीय निवासस्थानात रहात असल्यास त्याच्याकडून नियमानुसार अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात येईल.

8) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त अपवादात्मक परिस्थितीत करार पध्दतीने ठराविक कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या व्यक्तीस शासकीय सेवेतील कोणत्याही पदावर सरळ सेवेने नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेली शैक्षणिक अर्हता शिथिल केली जाणार नाही. मात्र, त्याबाबत वयोमर्यादेची अट रहाणार नाही.

2. करार पध्दतीवर नेमणूकीच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची पूर्व मान्यता घेण्यात यावी व त्या नंतर मुख्य सचिवांमार्फत शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

3. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक 104/95/सेवा-9, दिनांक 19 जानेवारी, 1995 नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

शांता शास्त्री
शासनाच्या प्रधान सचिव (सेवा).

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव,
* प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, विधान भवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, विधान भवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त, उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
निवड नस्ती.

* पत्राने.

------

एच-1352(3,500-2-95)

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर शासन सेवेत पुनर्नियुक्ती देण्याबाबत.

---

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: आरईएम-1595/प्र.क्र.48/95/13,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 9 नोव्हेंबर, 1995.

वाचा :-

(1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पीएससी-1071/1855/डी, दिनांक 10 ऑगस्ट, 1971.

(2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1073/डी-2, दिनांक 30 जुलै, 1973.

(3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1086/553/13, दिनांक 25 जून, 1986.

(4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1087/70/87/13, दिनांक 1 ऑक्टोबर, 1987.

(5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1089/प्र.क्र.2/89/13, दिनांक 9 फेब्रुवारी, 1989.

(6) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1593/प्र.क्र.75/93/13, दिनांक 22 डिसेंबर, 1993.

(7) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1594/467/13, दिनांक 3 सप्टेंबर, 1994.

(8) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-1994/467/13, दिनांक 8 फेब्रुवारी, 1995.

**शासन निर्णय :-** सेवानिवृत्त होणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केवळ अतिशय अपवादात्मक परिस्थितीत व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुनर्नियुक्ती देण्याबाबत वेळोवेळी सूचना देऊनही सेवानिवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती देण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा प्रकारे पुनर्नियुक्ती दिल्यामुळे पदोन्नतीस पात्र अधिका-यांना/कर्मचा-यांना योग्य वेळी पदोन्नती न मिळाल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो व वैफल्याची भावना निर्माण होते. तसेच काही कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहतात आणि पदोन्नती/सरळसेवेने भरावयाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. याबाबत शासनाकडे अनेक निवेदने आल्यामुळे सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती विहित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंबंधात यापूर्वी वेळोवेळी जे आदेश निर्गमित केलेले आहेत ते अधिक्रमित करून शासनाच्या ध्येय धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने आता याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

(1) नियत वयोमानानंतर (वयाची 58/60 वर्षे) सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांचे सेवेत पुनर्नियुक्ती/सेवेत वाढ मिळण्याबाबतचे अर्ज विचारात घेऊ नयेत.

(2) अतिशय अपवादात्मक परिस्थितीत व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पुनर्नियुक्ती (सेवेत वाढ नाहीच) द्यावयाची झाल्यास पुढील अटींची पूर्तता होत असल्याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी:-

(अ) ज्या पदावर पुनर्नियुक्ती द्यावयाची आहे, ते पद रिक्त होण्यापूर्वी किमान 6 महिने आधी प्रयत्न करूनही पदोन्नती किंवा बदलीद्वारे योग्य कर्मचारी उपलब्ध होऊ शकले नाहीत, नामनिर्देशनाद्वारे हे पद भरावयाचे असल्यास आयोगाकडे असे पद रिक्त होण्यापूर्वी 6 महिने आधी मागणीपत्र पाठविले असणे आवश्यक आहे.

(ब) संबंधित पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी कोणीही कर्मचारी उपलब्ध नाही किंवा संबंधित विभागामधून/कार्यालयामधून तात्पुरती पदोन्नती देऊन एखाद्या कर्मचा-याची नियुक्ती करणे शक्य नाही.

(क) सदर पद केवळ विशिष्ट कालावधीसाठीच ( Tenure Post ) असून सदर पद, पुनर्नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येणार आहे.

(ड) ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यास पुनर्नियुक्ती द्यावयाची आहे, त्याच्याजवळ त्या पदासाठी आवश्यक असणारी विशेष शैक्षणिक अर्हता (प्रामुख्याने तांत्रिक अर्हता) व सखोल अनुभव आहे आणि अशी अर्हता व अनुभव सेवेत असणा-या इतर कर्मचा-यांकडे नाही.

(इ) पुनर्नियुक्ती ही सार्वजनिक हिताच्या दृष्टीनेच करण्यात येत आहे.

(3) वरील अटींची पुर्तता होत असल्याचे सिध्द झाल्यानंतरच संबंधित प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची मान्यता घेऊन संबंधित प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी मा. मुख्य मंत्र्यांना संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांमार्फत सादर करण्यात यावा. तसे करताना यासोबतच्या परिशिष्टात विहित केलेले प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

(4) विहित कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन न करता शासनाकडे प्रस्ताव सादर करणा-या अधिका-यावर त्याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

(5) रु.3700-5000 किंवा त्याहून अधिक वेतनश्रेणीतील अधिका-यांच्या पुनर्नियुक्तीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांनी पाहिल्यानंतर मा. मुख्य मंत्र्यांकडे सादर करताना ते मुख्य सचिवांमार्फत सादर करण्यात यावेत.

(6) वरील आदेश सर्व गटांतील कर्मचा-यांना लागू होतील. तसेच शासनाचे विविध उपक्रम, महामंडळे, निमशासकीय व संविधानिक संस्था यांना देखील लागू होतील.

3. मंत्रालयाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी शासनाचे वरील सर्वसाधारण व धोरणात्मक आदेश त्या त्या गाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच संविधानिक संस्था, महामंडळे व इतर निक उपक्रम यांच्या निदर्शनास आणून वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना त्वरित द्याव्यात व । काटेकोरपणे अनुपालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. सी. श्रीवास्तव,
शासनाचे प्रधान सचिव.

1207(3000-11-95)-1अ

शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेत मुदतवाढ/ पुनर्नियुक्ती/ करार पद्धतीने नियुक्ती देताना विहित अटी/शर्ती यांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत.

डॉ.जगन्नाथ ढोणे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली जनहित याचिका क्र.८५/२००८ संदर्भातील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : आरईएम-१५०९/प्र.क्र.५८/२००९/१३

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १४ जानेवारी, २०१०

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीबीई-१८९३/प्र.क्र.३८/९३/तेरा, दिनांक १५ फेब्रुवारी, १९९५.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-१५९५/प्र.क्र.४८/९५/१३, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५.

३) या विभागाचे क्र.आरईएम-१५०९/प्र.क्र.३१/१३, दि.७.५.२००९ व दि.१.६.२००९ ची पत्रे.

४) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्र.डीएएन/२१६५२/(डब्ल्यूए) दि.१६.१२.२००९ चे पत्र व त्यासोबतचे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.९.१२.२००९ चे आदेश.

## शासन निर्णय :

दिनांक १५ फेब्रुवारी, १९९५ च्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/ कर्मचारी व विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांना करारपद्धतीने नियुक्ती देण्याबाबतची कार्यपद्धती व निकष ठरविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ च्या शासन निर्णयान्वये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ/पुनर्नियुक्तीच्या संदर्भात कार्यपद्धती व निकष ठरवून देण्यात आलेले आहेत. हे आदेश सर्व शासकीय, निमशासकीय, सांविधानिक संस्था, महामंडळे व इतर सार्वजनिक उपक्रम यांना देखील लागू करण्यात आलेले आहेत. मंजूर पदांवर अशा प्रकारच्या नेमणूका करण्यापूर्वी मंजूर पदे विहित पध्दतीने भरण्याची कार्यवाही न करणे अथवा त्यात विलंब करुन चालढकल करणे व कामाचे महत्त्व व तातडीच्या नावाखाली ठराविक व विशिष्ट सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना करारपद्धतीने नियुक्त्या, पुनर्नियुक्त्या व मुदतवाढी देण्यात आल्याच्या विरोधात डॉ.जगन्नाथ ढोणे व इतर यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र.८५/२००८

ही जनहित याचिका दाखल केली होती. सुनावणीच्या दरम्यान याचिकाकर्त्यांनी सेवानिवृत्तीनंतरच्या करारपद्धतीवरील नियुक्त्या, पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी यासबंधीची अनेक नियमबाह्य प्रकरणे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. अशा नियुक्त्या करताना व्यापक प्रसिध्दी न देता कोणतीही जाहिरात न देता, ठराविक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्याचेही याचिका कर्त्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यावर मा.उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करुन शासनाच्या वर नमूद केलेल्या धोरणास अनुसरून करारपद्धतीवरील नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी सर्व प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यात यावे तसेच ज्या करार पध्दतीच्या नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी नियमबाह्य आढळून येतील अशा सर्व नियुक्त्या तात्काळ रद्द करण्यात येतील व यापुढे शासनाच्या धोरणाच्या विरुद्ध कोणत्याही सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यास करार पध्दतीने/ मुदतवाढीने व पुनर्नियुक्तीने नेमणूका दिल्या जाणार नाहीत, असे स्पष्ट शपथपत्र शासनाच्या वतीने दाखल करावे, असे आदेश दिले होते. त्यास अनुसरून खालीलप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेनंतर शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

**" It is submitted that concerned appointing authorities will be advised to follow this policy strictly, and necessary instructions will be given to all departments to inform the appointing authorities under their control.**

**It is further stated and submitted that all existing post retirement appointments of State Government employees and their extensions will be reviewed. Those appointments which are not in accordance with the provisions of the Government Resolution dated 9/11/1995 or its subsequent amendments, will be terminated or phased out. This exercise of reviewing all cases of reappointments and/or extension of State Government officers and employees will be completed by 31.3.2010."**

वरीलप्रमाणे शासनाच्यावतीने दाखल करण्यात आलेले शपथपत्रात नमूद केल्यानुसार जरी दि.९.११.१९९५ च्या आदेशाचा उल्लेख असला तरी याचिकाकर्त्यांनी करारपध्दतीवरील नियमबाह्य नियुक्त्यांबाबत सुध्दा (जाहिराती न देणे, पदभरतीची कार्यवाही न करणे इ.) आक्षेप घेतला होता आणि सुनावणीच्या दरम्यान मा.न्यायालयाने त्याची दखल घेऊन तीव्र नाराजी व्यक्त केली होती. ही बाब विचारात घेऊन दि.१५.२.१९९५ च्या आदेशानुसार करार पध्दतीच्या नियुक्त्यांचे सुध्दा पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे. त्यानुसार शासकीय, निमशासकीय, सांविधानिक संस्था, महामंडळे व इतर सार्वजनिक उपक्रम इत्यादीमधील करारपध्दतीवरील नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी या सर्व प्रकरणांचा

दि.३१/०३/२०१० पर्यंत घ्यावा व ज्या नियुक्त्या शासनाच्या वर नमूद केलेल्या शपथपत्राप्रमाणे, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आढळून येणार नाहीत अशा सर्व करारपद्धतीवरील नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी तात्काळ रद्द करण्यात याव्यात व सोबतच्या नमुन्यातील प्रमाणपत्र मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी स्वत:च्या स्वाक्षरीने १५ दिवसांच्या आत सामान्य प्रशासन विभागास सादर करावे. हे आदेश सर्व मंत्रालयीन प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, निमशासकीय, सांविधानिक संस्था, महामंडळे व इतर सार्वजनिक उपक्रम इत्यादी यांना लागू राहतील. अशा कार्यालयातील आढावा घेण्याची कार्यवाही करण्याची व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी देखील संबंधित विभागाच्या सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांची राहील.

यापुढे शासकीय, निमशासकीय, सांविधानिक संस्था, महामंडळे व इतर सार्वजनिक उपक्रम इत्यादी मधून सेवानिवृत्तीनंतर करारपद्धतीने नियुक्त्या/पुनर्नियुक्त्या/ मुदतवाढी देण्याचे प्रस्ताव तपासताना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही, याची खबरदारी व दक्षता घेण्याची जबाबदारी संबधित नियुक्ती प्राधिकारी व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांच्यावर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्र.२०१००११४१७३८२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

१५.१.१०

( के.पी.बक्षी )
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
* प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, विधानभवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, विधानभवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय